शुल्क कायम ठेवल्याने हा आनंद पर्यंत होत होती. गावे सांभाळण्याची वेळ आली आहे. कृषी सहाय्यकांकडे १५७ गावाचा

# मातीची पाणीधारण क्षमता वाढविण्यास जैविक व सेंद्रीय खतांचा वापर करा

## ओझरला द्राक्ष चर्चासत्रात डॉ. ए के उपाध्याय यांचे मार्गदर्शन



**निफाड : प्रतिनिधी**

तपमानाच्या चढ उतारानुसार द्राक्षबागेस नत्र व खते पुरवठा केला पाहिजे द्राक्षेवेलीचे बोथावर लक्ष ठेवुन पाणी हे आतमध्ये मुरत असल्याबद्दल खात्री करावी माती पाणी परिक्षण करावे मातीची पाणी धारणा क्षमता वाढविण्यासाठी जैविक व सेंद्रिय खतांची योग्य मात्रा द्यावी असे मत राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र पुणेचे डॉं ए के उपाध्याय यांनी केले.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे वतीने द्राक्षभवन ओझर येथे आयोजित खरड छाटणी द्राक्ष व्यवस्थापन या विषयावरील चर्चासत्रात डॉं उपाध्याय बोलत होते महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे उपाध्यक्ष कैलासराव भोसले हे अध्यक्षस्थानी होते

व्यासपीठावर एन एच बी चे संचालक माणिकराव पाटील नाशिक विभागीय अध्यक्ष अँड रवींद्र निमसे मानद सचिव बाळासाहेब गडाख महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक अँड रवींद्र बोराडे एन आर सीचे डॉं ए के उपाध्याय डॉं डी एस यादव डॉं सुजाय साहा आदी मान्यवर उपस्थित होते प्रस्ताविक नाशिक विभाग अध्यक्ष अँड रविंद्र निमसे यांनी केल.

डॉं डी एस यादव यांनी आपल्या मार्गदर्शनात खोडकिड ही द्राक्षवेलीची प्रमुख समस्या आहे त्यासाठी जुलै ऑगस्ट मध्ये द्राक्षवेलीची साल काढावी फळछाटणीचे वेळी दर दहा दिवसात मिलिबग्ज बघुन जागेवरच नियंत्रित करावा मिलिबग्ज नियंत्रणासठी द्राक्षवेलीला तीव्र दाबाने फवारणी केली तर धुतले तर पिंक बेरीची समस्या उभी राहते त्यासाठी कमीत कमी केमिकलचा वापर केला पाहिजे असे मार्गदर्शन केले डॉं सुजाया साहा यांनी डावणी भुरी या रोगाचे नियंत्रण बुरशीज्न्य करपा जिवाणुजन्य करपा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करुन द्राक्षवेलीचे खरड छाटणीनंतरचे व्यवस्थापनाची माहिती दिली.

एन एच बीचे संचालक माणिकराव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले अध्यक्षीय भाषणातुन कैलासराव भोसले यांनी द्राक्ष उत्पादन विक्री व निर्यातीपुढील आव्हानाचा सामना करतांना चव व द्राक्षाची टिकवणक्षमता यावर भर देण्याचे अवाहन केले याप्रसंगी मानद सचिव बाळासाहेब गडाख यांनी सुत्रसंचालन केले संचालक सुरेशमामा कळमकर बबनराव भालेराव कैलास पाटील रावसाहेब रायते नंदकुमार पानगव्हाणे अँड रामनाथ शिंदे किशोर निफाडे सागर बोरस्ते, विजय घुमरे बबलु मोरे भारत सोनवणे सोमनाथ पडोळ वैभव तासकर ईश्वर महाले सोपान बोराडे राजेंद्र भालेराव नंदु पडोळ व्यवस्थापक योगेश गडाख संतोष मापारी जयराम पडोळ आदींसह द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक मंडळ उपस्थित होते.



उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

गांवकरी

vakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, गुरुवार, दि. ९ मे २०२४

7